SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

# Gramgeeta Mahavidyalaya, Chimur

Arts, Commerce and Science (Granted)

Dist. Chandrapur (M.S.) 442903

## सुचना

**इमारत देखभाल व सोयी सुविधा समिती सभा**
**ऑगष्ट 2024**

महाविद्यालयाच्या इमारत व सोयीसुविधा देखभाल समितीच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 16 ऑगष्ट 2024 रोज शुक्रवारला ठीक दुपारी 1:00 वाजता समितीची सभा मा. कार्य. प्राचार्य डॉ. हुमेश्वर डी. आनंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. करिता सभेला खालील सर्व समिती सभासदांनी उपस्थित राहावे. ही विनंती.

सभेमध्ये पुढील विषयांवर चर्चा करण्यात येईल.

विषय क्र.1:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

विषय क्र.2:- महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर लोखंडी प्रवेश गेट तयार करणे.

विषय क्र.3:- वर्गखोल्यातील डेस्क बेंचेस दुरुस्तीकरणे तसेच नवीन डेस्क बेंचेस घेणे.

विषय क्र.4:- क्रीडांगणाचा विकास करणे.

विषय क्र.5:- नवीन वॉटर फिल्टर खरेदी करणे.

विषय क्र.6:- माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

| **सभासदांचे नाव** | सह्या |
| --- | --- |
| १) डॉ. हुमेश्वर आनंदे -कार्य.प्राचार्य (अध्यक्ष) | |
| २) डॉ. निलेश ठवकर - समिती सदस्य | |
| ३) डॉ.बिजनकुमार शिल-समिती सदस्य | |
| ४) डॉ.युवराज बोधे -समिती सदस्य | |

समिती समन्वयक
प्रा. संदिप मेश्राम

प्राचार्य

Off. Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur. Dist. Chandrapur

**इमारत देखभाल व सोयी सुविधा समिती इतिवृत्त**
**ऑगस्ट 2024**

आज दिनांक दिनांक 16 ऑगस्ट 2024 रोज शुक्रवारला ठीक दुपारी 1:00 वाजता महाविद्यालयाच्या इमारत देखभाल व सोयीसुविधा समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या सभेचे अध्यक्ष कार्य. प्राचार्य डॉ. हुमेश्वर आनंदे यांच्यासह सर्व सभासद उपस्थित होते त्यांनी खालील विषयावर चर्चा करून ठराव मंजूर केले.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. हुमेश्वर आनंदे –कार्य.प्राचार्य (अध्यक्ष) | ------------------------ |
| २) डॉ. निलेश ठवकर - समिती सदस्य | ------------------------ |
| ३) डॉ.बिजनकुमार शिल-समिती सदस्य | ------------------------ |
| ४) डॉ.युवराज बोधे -समिती सदस्य | ------------------------ |
| ५) प्रा. संदिप मेश्राम-समन्वयक | ------------------------ |

**विषय क्र.1:-मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**ठराव क्र1:-** इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची मागील बैठक ही दिनांक 20 जानेवारी 2024 रोज शनीवारला संपन्न झाली होती. त्या सभेचे इतिवृत्त व करण्यात आलेल्या देखभालीच्या कामाचा आढावा घेण्यात आला. यावर सर्व सभासदांनी साधक-बाधक चर्चा करून ठराव मंजूर केले.

**विषय क्र.2:- महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर लोखंडी प्रवेश गेट तयार करणे.**

**ठराव क्र.2:-** आजची सभा सुरु असतांना डॉ. हुमेश्वर आनंदे यांनी सांगितले की, महाविद्यालयातील साधनसामग्री व इतर मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी प्रवेशद्वारावर लोखंडी प्रवेश गेट असणे आवश्यक आहे. यावर उपस्थित सभासंदामध्ये चर्चा करण्यात येऊन उपरोक्त विषयाला होकार दर्शवत सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले.

**विषय क्र.3:- वर्गखोल्यातील डेस्क बेंचेस दुरुस्तीकरणे तसेच नवीन डेस्क बेंचेस घेणे.**

ठराव क्र.3:-

आजच्या सभेमध्ये चर्चा करतांना डॉ. युवराज बोधे यांनी अशी सूचना केली की, वर्गाखोल्यांमधील अनेक डेस्क बेंचेस हे मोडकळीस आलेले आहेत तेव्हा काही डेस्क बेंचेस दुरुस्ती करण्यात यावे आणि काही डेस्क बेंचेस नवीन खरेदी करण्यात यावे, यावर समिती सभासदांनी चर्चा करून सर्वांनी एकमताने ठराव मंजूर केला.

विषय क्र.4:- क्रीडांगणाचा विकास करणे.

ठराव क्र.4:- सभेमध्ये डॉ. बिजनकुमार शील यांनी विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर माती टाकणे आवश्यक असल्याचे मत मांडले. यावर उपस्थित सभासदांमध्ये चर्चा झाली व क्रीडांगणावर माती टाकण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्र.5:- नवीन वॉटर फिल्टर खरेदी करणे.**

ठराव क्र. 5:- आज सुरु असलेल्या सभेमध्ये डॉ. निलेश ठवकर यांनी, जुने वॉटर फिल्टर हे नादुरुस्त असून विद्यार्थ्यांना पाणी पिण्याची समस्या जाणवत आहे करिता नवीन वॉटर फिल्टर खरेदी करण्यात यावे. यावर सर्व सभासदांनी चर्चा करून ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

**विषय क्र.4:- माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

ठराव क्र.4:-आजच्या सभेमध्ये माननीय अध्यक्ष यांची परवानगी घेऊन सभेत कोणत्याही सभासदाने प्रश्न उपस्थित न केल्यामुळे उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा समाप्त करण्यात आली. ठराव मंजूर करण्यात आले.

**समिती समन्वयक**
प्रा. संदिप मेश्राम

**प्राचार्य**
Off. Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

# Gramgeeta Mahavidyalaya, Chimur

Arts, Commerce and Science (Granted)

Dist. Chandrapur (M.S.) 442903

## सुचना

**इमारत देखभाल व सोयी सुविधा समिती सभा**
**जानेवारी 2025**

महाविद्यालयाच्या इमारत व सोयीसुविधा देखभाल समितीच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 11 जानेवारी 2025 रोज शनीवारला ठीक सकाळी 11:00 वाजता समितीची सभा मा. प्राचार्य डॉ. सुनंदा एस. आस्वले यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. करिता सभेला खालील सर्व समिती सभासदांनी उपस्थित राहावे. ही विनंती.

सभेमध्ये पुढील विषयांवर चर्चा करण्यात येईल.

विषय क्र.1:- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

विषय क्र.2:- वर्गखोल्यामध्ये नवीन डेस्क बेंचेस घेणे.

विषय क्र.3:- भौतिकशास्त्र विभागात डार्करूम तयार करणे.

विषय क्र.4:- मंदिर परिसरातील शेडची दुरुस्ती करणे तसेच सेमिनार हॉलमध्ये स्लायडिंग खिडक्या बसविणे.

विषय क्र. 5:- माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. सुनंदा एस. आस्वले प्राचार्य (अध्यक्ष) | Aswale |
| २) डॉ. निलेश ठवकर - समिती सदस्य | [signature] |
| ३) डॉ. विजनकुमार शिल - समिती सदस्य | Shil |
| ४) डॉ. युवराज बोधे - समिती सदस्य | [signature] |

[signature]
समिती समन्वयक
प्रा. संदिप मेश्राम

[signature]
प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

# Gramgeeta Mahavidyalaya, Chimur

Arts, Commerce and Science (Granted)
Dist. Chandrapur (M.S.) 442903

**इमारत देखभाल व सोयी सुविधा समिती इतिवृत्त**
**जानेवारी 2025**

आज दिनांक दिनांक 11 जानेवारी 2025 रोज शनीवारला ठीक सकाळी 11:30 वाजता महाविद्यालयाच्या इमारत देखभाल व सोयीसुविधा समितीची बैठक आयोजित करण्यात आली. सभेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनंदा एस. आस्वले यांच्यासह सर्व सभासद उपस्थित होते त्यांनी खालील विषयावर चर्चा करून ठराव मंजूर केले.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. सुनंदा एस. आस्वले-प्राचार्य (अध्यक्ष) | |
| २) डॉ. निलेश ठवकर - समिती सदस्य | |
| ३) डॉ.बिजनकुमार शिल-समिती सदस्य | |
| ४) डॉ.युवराज बोधे -समिती सदस्य | |
| ५) प्रा. संदिप मेश्राम-समन्वयक | |

**विषय क्र.1:-मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**ठराव क्र1:-** इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची मागील बैठक ही 16 ऑगष्ट 2024 रोज शुक्रवारला संपन्न झाली होती. त्या सभेचे इतिवृत्त व करण्यात आलेल्या देखभालीच्या कामाचा आढावा समिती समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी सादर केला. यावर सर्व सभासदांनी साधक-बाधक चर्चा केली, इतिवृत्त कायम करून ठराव मंजूर केले.

**विषय क्र.2:- वर्गखोल्यामध्ये नवीन डेस्क बेंचेस घेणे.**

**ठराव क्र.2:-** आजची सभा सुरू असतांना डॉ.बिजनकुमार शिल यांनी सांगितले की, महाविद्यालयातील वर्गाखोल्यांमधील अनेक डेस्क बेंचेस हे मोडकळीस आलेले आहेत तेव्हा काही डेस्क बेंचेस नवीन खरेदी करण्यात यावे, यावर समिती सभासदांनी चर्चा करून सर्वांनी एकमताने नवीन डेस्क बेंचेस खरेदी करण्याचा ठराव मंजूर केला.

**विषय क्र.3:- भौतिकशास्त्र विभागात डार्करूम तयार करणे.**

**ठराव क्र.3:-** आजच्या सभेमध्ये चर्चा करतांना डॉ. युवराज बोधे यांनी अशी सूचना केली की, भौतिकशास्त्र विभागातील प्रयोगशाळेत डार्करूम उपलब्ध नाही तेव्हा विद्यार्थ्यांना प्रयोग करण्याकरिता डार्करूमची आवश्यकता आहे., यावर समिती सभासदांनी चर्चा करून सर्वांनी एकमताने डार्करूम तयार करण्याबाबत ठराव मंजूर केला.

**विषय क्र.4:- मंदिर परिसरातील शेडची दुरुस्ती करणे तसेच सेमिनार हॉलमध्ये स्लायडिंग खिडक्या बसविणे.**

**ठराव क्र.4:-** आजच्या सभेमध्ये डॉ. निलेश ठवकर यांनी मंदिर परिसरातील शेड दुरुस्ती करणे व सेमिनार हॉलमधील खिडक्यांच्या काच फुटलेल्या स्थितीत आहेत असा मुद्दा उपस्थित केला असता सभासदांमध्ये चर्चा झाली व मंदिर परिसरातील शेड दुरुस्ती करणे व सेमिनार हॉलमध्ये स्लायडिंग खिडक्या बसविण्यात यावे असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्र.4:- माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

**ठराव क्र.4:-**आजच्या सभेमध्ये माननीय अध्यक्ष यांची परवानगी घेऊन सभेत कोणत्याही सभासदाने प्रश्न उपस्थित न केल्यामुळे उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा समाप्त करण्यात आली. ठराव मंजूर.

**समिती समन्वयक**
प्रा. संदिप मेश्राम

**प्राचार्य**
Principal
Gramgeeta Mahavidyalay
Chimur, Dist. Chandrapu